# फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि मुकुल माधव फाऊंडेशनकडून विधवा महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करत आहेत

उस्मानाबाद, १० जून,२०२३: फिनॉलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेडची सीएसआर शाखा मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) उस्मानाबादच्या रखरखीत भूमीत, जिथे दुष्काळ आणि शेतककऱ्यांच्या आत्महत्या यामुळे निराशेची छाया पडली आहे, विधवा महिला व शेतकर्यांचे सक्षमीकरण करून त्यांच्या जीवनात आशेचे किरण आणत आहे. सामाजिक उत्तरदायित्वाप्रती मनापासून बांधिलकी ठेवून, मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) ने समाजाला भेडसावणारा संघर्ष कमी करण्यासाठी एक परिवर्तनात्मक प्रवास सुरू केला आहे.२०१९ मध्ये मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) ने स्थानिक एनजीओ साई मित्र परिवारासोबत सहभागीदारी करून सर्वसमावेशक गरजांचे सर्वे क्षण व मूल्यांकन केले. त्या सर्वेक्षणामध्ये उस्मानाबादमधील दुष्काळ आणि परिणामी शेतकऱ्यांच्या आत्महत्या या कारणामुळे विधवांची लक्षणीय संख्या वाढल्याचे उघडकीस आले. पर्याय फाऊंडेशनच्या पाठिंब्याने मुकुल माधव फाऊंडेशन (एमएमएफ) ने या विधवा महिलांना मदत करण्याच्या उद्देशाने एक प्रकल्प सुरू केला आणि आतापर्यंत एकूण ४१२ लाभार्थ्यांना त्यामुळे मदत झाली.